

# नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ

**(म्हाडाचा विभागीय घटक)**

**गृहनिर्माण भवन,गडकरी चौक,नाशिक**

फोन - ०२५३-२२२९२०३ ते २२२९२४५

## सोयीसुविधा, व्यावसायिक व विशिष्ट प्रयोजनासाठी राखीव असलेल्या अनिवासी भुखंडाचा ई-लिलाव -२०२५

नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ नाशिक मंडळातर्फे महाराष्ट्र गृहनिर्माण व क्षेत्रविकास (मिळकत व्यवस्थापन, गाळ्यांची विक्री, हस्तांतरण व अदलाबदल) विनियम १९८१ आणि म्हाड (जमिनीची विल्हेवाट) नियम १९८१ मधील तरतुदींनुसार विविध योजनांतर्गत **३१** अनिवासी भुखंडासाठी ई-लिलाव जाहिरात प्रसिद्ध करण्यात येत आहे.

### अर्जदारांना नोंदणी करण्यासाठी, ऑनलाईन अर्ज करण्यासाठी व निकालाबाबतचे वेळापत्रक

| | | | |
|---|---|---|---|
| १ | ई-लिलाव प्रक्रियेत भाग घेण्यासाठी म्हाडाच्या संकेत स्थळावर नोंदणी करणे, ऑनलाईन अर्ज करणे, कागदपत्रे अपलोड करणे, अनामत रक्कम भरणे इत्यादीकरीता सुरुवात दिनांक व वेळ | सुरवात दिनांक व वेळ | दि.३०/६/२०२५ दुपारी १२.०० वाजेपासून |
| | | अंतिम दिनांक व वेळ | दि. २९/७/२०२५ रात्री ११.५९ वाजेपर्यंत. |
| २ | ई-लिलावाकरिता RTGS/NEFT व्दारे अनामत रक्कम भरण्याचा अंतिम दिनांक | | दि. ३०/७/२०२५ रोजी संबंधित बँकेच्या कार्यालयीन वेळेपर्यंत |
| ३ | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) सुरु होण्याची दिनांक व वेळ | | दि. ६/८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजेपासून |
| ४ | ई-लिलाव (ऑनलाईन बोली) करीता अंतिम दिनांक व वेळ | | दि. ६/८/२०२५ रोजी दुपारी ५.०० वाजेपर्यंत |
| ५ | ई-लिलावचा एकत्रित निकाल जाहीर करण्याचा दिनांक | | दि. ७/८/२०२५ रोजी सकाळी ११.०० वाजता |

**अर्ज सादर करण्यासाठी संकेतस्थळ : https://eauction.mhada.gov.in**

ऑनलाईन अर्जाची किंमत तसेच ई-लिलाव प्रक्रिया शुल्क रु.६०००/- + रु.१०८० (१८% जीएसटी) = **रु.७,०८०/-** (विनापरतावा).

सर्व अनिवासी भुखंडासाठी अर्ज शुल्क व्यतिरिक्त प्रत्येक अर्जनिहाय अनामत रक्कम **रु.५०,०००/-** याचा वेगळा ऑनलाईन भरणा करावा लागेल.

विस्तृत पात्रता निकष, प्रत्येक भुखंडाचे विस्तृत विवरण, भुखंडाचे वापराबाबतचे आरक्षण व अर्ज करण्याची कार्यपध्दती, तसेच म्हाडा कायदयानुसार असलेल्या ई-लिलाव संबंधित सविस्तर अटी व शर्ती तसेच ऑनलाईन अर्ज सुचना माहितीपुस्तिका, जाहिरात इत्यादी सर्व माहिती खाली दिलेल्या क्यु-आर कोड वर उपलब्ध आहे. ईच्छुक नागरीकांनी संकेत स्थळावरील व माहिती पुस्तिकेतील सर्व अटी व शर्ती काळजीपुर्वक वाचून तसेच जागेवर समक्ष पाहणी करुनच अर्ज सादर करावा. अर्जदारास छपाई मधील कोणत्याही चुकीचा गैर फायदा घेता येणार नाही.अनिवासी भूखंडांच्या वितरणासाठी म्हाडाने कोणासही प्रतिनिधी, सल्लागार व प्रॉपर्टी एजंट म्हणून नेमलेले नाही. अर्जदाराने अशा कोणत्याही व्यक्तीशी परस्पर व्यवहार करू नये. तसे केल्यास नाशिक मंडळ/म्हाडा कोणत्याही व्यवहारास/फसवणूकीस जबाबदार राहणार नाही. जाहिरातीतील कोणत्याही चुकीच्या दुरुस्तीबाबतचे तसेच ई-लिलाव संबंधित सर्व अधिकार मुख्य अधिकारी/ नाशिक मंडळ यांनी राखून ठेवलेले आहेत.

स्वाक्षरीत/-
(रंजन पुंजाराम ठाकरे)
सभापती
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
नाशिक

स्वाक्षरीत/-
(शिवकुमार आवळकंठे)
मुख्य अधिकारी
नाशिक गृहनिर्माण व क्षेत्रविकास मंडळ
नाशिक